REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# स्वातंत्र्योत्तर राजकीय कारकिर्दीतील लाल बहादुर शास्त्री यांचे कार्य व भूमिका

स्नेहा विकासराव नागरमोते[१] , डॉ. सौ. अलका विनायकराव देशमुख[२]
[१] संशोधनकर्ती , एम. ए. (राज्यशास्त्र)
[२] मार्गदर्शक , एम.ए. (राज्यशास्त्र, समाजशास्त्र), एम.फील., पीएच्.डी.
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

**सारांश**

प्रस्तूत लेखात स्वातंत्र्योत्तर राजकीय कारकिर्दीतील लाल बहादुर शास्त्री यांचे कार्य व भूमिकेचा आढावा घेण्यात आला आहे. १९५२ नंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात रेल्वे व वाहतूक दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रिपद ही पदे शास्त्रींनी भूषविली. त्यांच्या रेल्वे व परिवहन मत्रीत्वाच्या कारकिर्दीत त्यांनी रेल्वेत अनेक सुधारणा घडवून आणल्या. वाणिज्य व उद्योग मंत्री असतांना निर्यातीला प्रोत्साहन देणे, नवे औद्योगिक प्रकल्प उभारणे या गोष्टींकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. गृह मंत्री असतांना आसाम मधिल भाषीक वाद सोडवला त्याचप्रमाणे पंजाब मध्ये स्वतंत्र पंजाबी सुभ्यासाठी आंदोलनाची समस्या त्यांनी निपटून काढली. प्रशासनातील मूलभूत बाबींबद्दल शास्त्रींनी मंत्री व अधिकारी यांच्या संबंधांबाबत काही तत्त्वे ठरवून दिली. अधिकाऱ्यांना आपली मते स्पष्टपणे मांडता आली पाहिजेत. परंतु अखेर त्यांनी मंत्र्याचे आदेश पाळायला हवेत व मंत्र्यांनी आचारसंहिता स्वीकारावी. त्यांनी तोंडी आदेश वा सूचना देणे टाळावे. तसेच अधिकाऱ्यांनी गटबाजीच्या राजकारणातून दूर राहावे, असे शास्त्रींनी सुचविले होत. बिन खात्याचे मंत्री असतांना त्यांनी अत्यंत महत्वपूर्ण अशा प्रेषिताचा पवित्र अवशेष गायब झाल्यावर कश्मिरमध्ये उद्भवलेला पेचप्रसंग आपल्या बुद्धीचातूर्याने व न्यायबुद्धीने सोडवला. अशाप्रकारे शास्त्रीजींची राजकीय कारकिर्द ही विकासात्मक असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे आजच्या राजकीय परिस्थितीत त्यांचे कार्य प्रोत्साहक व अनुकरणीय असल्याचे देखील दिसून येते.



**प्रस्तावना**

काँग्रेसने १९४१ मध्ये राजकीय चळवळीची नीट आखणी केली व काही निवडक नेत्यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्यास सांगण्यात आले. त्यांत शास्त्रींचाही अंतर्भाव होता. ते सत्याग्रहात सामील झाले. त्या वेळी दोस्त राष्ट्रांच्या दृष्टीने युद्धाची परिस्थिती प्रतिकूल होती. नाझींनी जवळवजवळ पश्चिमयुरोपवर कब्जा मिळवला होता. इंग्लंडवर आक्रमण होण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे भारतात काही राजकीय तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारने सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचे शिष्टमंडळ भारतात पाठविले. केंद्रात जबाबदार सरकार स्थापावं, सर्व भारतीय सदस्यांचाच अंतर्भाव असलेल्या मंत्रिमंडळाच्या हाती खरी सत्ता असावी व व्हाईसरॉय हे नाममात्र प्रमुख असावेत अशा मागण्या काँग्रेसने ब्रिटिशांपुढे मांडल्या.[१] १९४२ च्या ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात मुंबई इथे काँग्रेसचे अधिवेशन घ्यायचे ठरले. या अधिवेशनाला पक्षाचे सर्व नेते, देशाच्या विविध भागांतून आलेले कार्यकर्ते हजर होते. स्वातंत्र्यासाठी मोठे जनआंदोलन उभारांवे असे सर्वांच मत होते. ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' ठराव अधिवेशनात मंजूर झाला.ब्रिटिशांनी तत्काळ देश सोडून निघून जावे या मागणीने सबंध देश जणू विद्युतसंचार

[१] मनकेकर, डी. आर. (१९९६). लाल बहादुर शास्त्री, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, तृतीय संस्करण. पृ –११५.

झाल्यासारखा भारला गेला.[२]

भारताला स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटिश सरकारने ठरवले. २४ मार्च १९४७ रोजी लार्ड माऊंटबॅटन यांचा नवे व्हाईसरॉय म्हणून शपथविधी झाला. स्वातंत्र्य मिळाले, पण देशाची फाळणी झाली. भारत व पाकिस्तान असे दोन देश निर्माण करण्यात आलें. परंतु उभय देशांतून उसळलेल्या दंगलींनी लोकांचे लोंढेच्या लोंढे बाहेर पडले. रक्तपात, कत्तली यांचा वणवा पेटला. अशा परिस्थितीत पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताचे पहिले सरकार सत्तेवर आले.

१९४५ ते १९४७ मधील या घडामोडींच्या वेळी लालबहादुर शास्त्री हे उत्तर प्रदेश काँग्रेसचे नेते म्हणून काम पाहत होते. १९४५ मध्ये राज्य विधानसभांच्या निवडणुका जाहीर झाल्या. उत्तर प्रदेशातील निवडणुकांची जबाबदारी काँग्रेसने शास्त्रींवर सोपवली. उत्तर प्रदेशच्या काँग्रेस संसदीय मंडळाच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. योग्य उमेदवारांची निवड करणे, व्यापक प्रचारमोहीम आखणे अशा विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर येऊन पडल्या.[३]

## राजकिय कारकिर्द व कार्य

शास्त्रींची एकनिष्ठताही कमालीची होती. १९४६ साली उत्तर प्रदेशच्या मुख्य मंत्र्यांच्या संसदीय सचिवपदी त्यांची नियुक्ती झाली. नंतर ते गृह व वाहतूक खात्याचे मंत्री झाले. १९५१ मध्ये पं. नेहरूंनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले व काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीसपदी त्यांची नेमणूक केली. १९५१—५२ मध्ये भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत काँग्रेसच्या प्रचारमोहिमेहची जबाबदारी जवळजवळ शास्त्रींनाच पार पाडावी लागली.[४]

सार्वत्रिक निवडणुकीनंतर लोकसभेची बैठक बोलवण्यात आली. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी पंडित नेहरूंना पंतप्रधानपदाची शपथ घेण्यास व सरकार स्थापन करण्यास पाचारण केले. नेहरूंनी शास्त्रींना मंत्रिमंडळात सामील करण्याचे ठरवले. ते एकाही सभागृहाचे सदस्य नव्हते. राज्यसभेवर ते निवडून येतील अशी व्यवस्था पं. नेहरूंनी केली. १३ मे १९५२ रोजी रेल्वे व वाहतूक खात्याचे मंत्री म्हणून शास्त्रींचा शपथविधी झाला.[५]

रेल्वेच्या सुधारणेच्या सर्व योजनांना त्यांनी उत्तेजन दिले. दूर अंतरावरील गाड्यांतून तिसऱ्या वर्गातील उतारूंसाठी जादा शयनिकांची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली. सामान्य माणसांच्या दृष्टीने ही महत्त्वाची सोय होती. त्यांनी भोजनालय व कंडक्टर यांची सोय असलेली जनता 'कॉरिडॉर ट्रेन' सुरू केली. त्यांच्याच काळात कमी अंतरावरील गाड्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यांची जोड सोय आणि दिल्ली—मुंबई, मद्रास व कलकत्ता या स्टेशनांदरम्यान वातानुकूलित द्रुतगतीने धावणाऱ्या गाड्या सुरु झाल्या. तिसरा वर्ग रद्द करण्याची घोषणा त्यांनी केली. रेल्वे खात्याकडे रेल्वेवरील खानपान सेवा सोपवून त्यांनी खाद्यपदार्थांचा दर्जा सुधारला.

रेल्वेची मालमत्ता व वाहून नेला जाणारा माल यांच्या सुरक्षेत सुधारणा व्हावी म्हणून रेल्वे बोर्डावर त्यांनी एक सुरक्षा सल्लागार नेमला. त्यांच्या सल्ल्यानुसार वॉच अँड वार्ड विभागाचे रेल्वे सुरक्षा पथकात रूपांतर करण्यात आले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने हे पथक काम करू लागले व सुरक्षा सुधारली. उत्तर व दक्षिण बिहारला जोडणाऱ्या गंगा पूल योजनेला त्यांनी मंजुरी दिली. त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन येथील रेल्वे कारखान्याचे उत्पादन वाढले. तिथे दर वर्षी १२० ऐवजी २०० इंजिनांचे उत्पादन सुरू झाले.

ऑगस्ट १९५६ मध्ये महबूबनगर इथे भीषण रेल्वे अपघात होऊन ११२ जण ठार झाले. रेल्वेमंत्री या नात्याने या अपघाताची जबाबदारी पत्करून त्यांनी मंत्रिपदाचा राजिनामा पंतप्रधानांकडे पाठवून दिला. परंतु पंतप्रधानांनी तो स्वीकारला नाही. दुर्दैवाने नोव्हेंबर १९५६ मध्ये दक्षिण भारतातील अरिवालूर इथे दुसरा रेल्वे अपघात होऊन १४४ जण मरण पावले. त्याची नैतिक जबाबदारी पत्करून शास्त्रींनी पुन्हा राजिनामा दिला. या

[२] मनकेकर, डी. आर. (१९९६). लाल बहादुर शास्त्री, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, तृतीय संस्करण. पृ —११९.

[३] श्रिवास्तव, सी. पी. (अनुवादक— अशोक जैन), लालबहादुर शास्त्री, राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम, आठवी आवृत्ती, २००७, रोहन प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, पृ. ५०—५१

[४] मनकेकर, डी. आर. (१९९६). लाल बहादुर शास्त्री, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, तृतीय संस्करण. पृ —१२१.

[५] मित्तल, हरिराम, (१९९६). लाल बहादुर शास्त्री, व्यक्ति और विचार, संपादक एस.सी. पाठक व जी.पी. श्रीवास्तव, एस.चन्द्र एण्ड कंपनी लि., नई दिल्ली. पृष्ठ—५६.

वेळी शास्त्रींनी आग्रहच धरल्याने पं. नेहरूंना तो स्वीकारणे भाग पडले.[६] शास्त्रींच्या राजिनाम्यामुळे त्यांची नैतिक प्रतिमा अधिकच उंचावली. राजकीय वर्तनाचा नवा पायंडाच त्यांनी घालून दिला. या राजीनाम्यामुळे पं. नेहरूंशी त्यांची अधिकच जवळीक निर्माण झाली. १९५७ मधील दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकींच्या वेळी पंडितजींनी काँग्रेस पक्षाच्या प्रचारमोहिमेच्या प्रमुखपदी शास्त्रींची नियुक्ती केली. अलाबादहून ते उभे राहिले. ते प्रचंड बहुमतांने विजयी झाले. पूर्वीपेक्षाही संघटनेत त्यांचे महत्व वाढले. पंडित नेहरूंनी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला. वाहतूक व दळणवळण खात्याचे मंत्री म्हणून १७ एप्रिल १९५७ रोजी त्यांचा शपथविधी झाला.

वाहतूक व दळवळण खात्यात शास्त्री एक वर्षाहून कमी काळ होते. त्या वेळच्या मुदंडा भानगड प्रकरणी टी. टी. कृष्णम्माचारी यांना १९५८ च्या सुरुवातीला राजीनामा देणे भाग पडले. त्या वेळी वाणिज्य व उद्योग मंत्री असलेले मोरारजी देसाई यांची अर्थमंत्रिपदी नेमणूक करण्यात आली आणि शास्त्रींकडे वाणिज्य व उद्योग खाते सोपविण्यात आले (२८ मार्च १९५८). या बढतीमुळे नेहरूंच्या मंत्रिमंडळातील एक महत्त्वाचे स्थान त्यांना मिळाले, देशात औद्योगिक स्वावलंबनाचा पाया घालणे व आधुनिक दृष्टिची कार्यक्षम अर्थव्यवस्था तयार करणे ही महत्त्वाची जबाबदारी त्यांना पार पाडायची होती.

निर्यातीला प्रोत्साहन देणे, नवे औद्योगिक प्रकल्प उभारणे या गोष्टींकडे ते विशेष लक्ष देऊ लागले. नेहरू सरकारची औद्योगिक धोरणे त्यांनी अमलात आणली. कंपनी कायद्याविषयीचा त्यांचा निर्णय उद्योगपतींना रुचला नाही तरी त्यांच्याविषयीचा आदर कमी झाला नाही. त्यांच्याच काळात एच. एम. टी. ची स्थापना झाली. नानगल खत कारखान्यात उत्पादन सुरू झाले. शास्त्रींनी कृषी व उद्योग यांच्या एकात्मीकरणाची योजना आखली असेही त्यांनी म्हटले आहे.

१९६१ च्या आरंभी गृहमंत्री गोंविद वल्लभ पंत हे आजारी पडले, तेव्हा पं. नेहरूंनी २५ फेब्रुवारी १९६१ रोजी गृह खात्याचा अतिरिक्त कारभार शास्त्रींकडे सोपवला. पंतांची प्रकृती आणखीच बिघडली व एप्रिलमध्ये त्यांचे निधन झाले. तेव्हा शास्त्रींची नवे गृहमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली.[७] शास्त्री यांनी गृहमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा आसाममध्ये भाषेच्या प्रश्नावरून आंदोलन धगधगत होते. एप्रिल व जुलै या दोन महिन्यांत तिकडे भाषिक दंगे उसळून बरेच जण मृत्युमुखी पडले. अखेर राज्य सरकारने कायदा करून आसामीला राजभाषेचे स्थान दिले. त्यामुळे बंगाली भाषकांनी आपल्या भाषेला अतिरिक्त दर्जा मिळावा म्हणून आंदोलन सुरू केले व पुन्हा भाषिक दंगे उसळले. ३१ मे १९६१ रोजी शास्त्री गोहाटीला पोचले. आसामी व बंगाली भाषांच्या प्रतिनिधींशी त्यांनी वाटाघाटी केल्या आणि उभयतांनी समाधानकारक तोडगा काढला. या 'शास्त्री' तोडग्यानुसार इंग्रजी, आसामी व बंगाली या तिन्ही भाषांचा वापर केला जाणार होता. काचार जिल्ह्यात बंगाली भाषकांची सर्वाधिक वस्ती होती. तेव्हा काचार जिल्हा व आसामची राजधानी या ठिकाणी इंग्रजीत पत्रव्यवहार करावा, बंगालीला प्राधान्य दिले जाईल, जिल्हा कार्यालय, शाळा यांतून आसामीतून व बंगालीतून व्यवहार केले जातील असे या तोडग्याचे स्वरूप होते.

अकाली दलाचे मास्टर तारासिंग यांनी ऑगस्ट १९६१ मध्ये स्वतंत्र पंजाबी सुभ्यासाठी आंदोलन सुरू केले. तेव्हा शास्त्रींनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश एस. आर. दास. यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोगाची नियुक्ती केली. सी. आर. रामस्वामी अय्यर व एम. सी. छगला या आयोगाचे सदस्य होते पंजाबमधील शिखांच्या बाबतीत पक्षपात केला जात नाही, पंजाबमध्ये व पंजाबबाहेर शिखांना सन्मानानेच वागवले जाते, असा स्पष्ट निर्वाळा या आयोगाने दिला. मास्टर तारासिंग यांचे उपोषण अठ्ठेचाळीस दिवस चालले, परंतु ते निष्फळ ठरले. शास्त्रींनी खंबीरपणे हा प्रश्न हाताळला त्याचे ते फळ होते.[८]

शास्त्रींनी जून १९६३ मध्ये प्रशासनातील मूलभूत बाबींबद्दल एक टाचण तयार केले. लाल फितीचा कारभार कमी व्हावा म्हणून अमेरिकेच्या धर्तीवर एक उच्चस्तरीय आयोग स्थापावा असे त्यांनी त्यात सुचवले होत. मंत्री व अधिकारी यांच्या संबंधांबाबत काही तत्त्वे ठरवून द्यायला हवीत. अधिकाऱ्यांना आपली मते स्पष्टपणे मांडता आली पाहिजेत. परंतु अखेर त्यांनी मंत्र्याचे आदेश पाळायला हवेत व मंत्र्यांनी आचारसंहिता स्वीकारावी. त्यांनी

6 Singh, Lallan Prasad, Portrait of Lal Bahadur Shastri: A Quintessential Gandhian, Ravidayal Publisher, New Delhi, 1996, pp- 96

७ मित्तल, हरिराम, (१९९६). लाल बहादुर शास्त्री, व्यक्ति और विचार, संपादक एस.सी. पाठक व जी.पी. श्रीवास्तव, एस.चन्द एण्ड कंपनी लि., नई दिल्ली. पृष्ठ—३९.

८ श्रिवास्तव, सी. पी. (अनुवादक— अशोक जैन), लालबहादुर शास्त्री, राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम, आठवी आवृत्ती, २००७, रोहन प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, पृ. ५९—६१

तोंडी आदेश वा सूचना देणे टाळावे. तसेच अधिकाऱ्यांनी गटबाजीच्या राजकारणातून दूर राहावे, असे शास्त्रींनी सुचविले होत.[९]

कामराज योजने अंतर्गत गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यावर शास्त्री यांची पक्षाच्या संसदीय मंडळावर त्याचप्रमाणे संघटनात्मक समितीवर नियुक्ती झाली. भुवनेश्वर येथे पं. नेहरूंनी शास्त्रींना त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील करून प्रथम बिनखात्याचे मंत्री म्हणून शास्त्री यांची नियुक्त करण्यात आली.[१०]

प्रेषिताचा पवित्र अवशेष गायब झाल्यावर कश्मिरमध्ये उद्‌भवलेला पेचप्रसंग सोडवण्यासाठी त्यांना पंतप्रधानांनी पाठवले. तो प्रश्न निखालसपणे सोडवून त्यांनी आपल्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला आहे. विरोधकांशी सुद्धा न्यायबुद्धीने, सहिष्णुतेने व समंजसपणे वागणे हा त्यांचा गुण आहे. त्यामुळेच कश्मिरमधील सर्व गटांचा विश्वास त्यांनी संपादन केला आणि गृहमंत्री व त्यांचे सल्लागार यांचे अनुकूल मत नसतानाही अवशेषाची छाननी करू देण्याचा धोका पत्करला. तो लाभदायक ठरला. मुस्लीम भक्तांनी अवशेष खरा असल्याची ग्वाही दिली. या वादातील धार्मिक पैलू निकालात निघाला. हा पैलू राजकारणापासून अलग करण्यात शास्त्रींना यश आले. केंद्रीय गृहमंत्रालयाला हेच साध्य करायचे होते.''[११]

## निष्कर्ष

एक व्यक्ती म्हणून पाहिले तर शास्त्रींमध्ये एखाद्या महात्म्याची नैतिक लक्षणे होती. सत्याचा मार्ग त्यांनी कधीही सोडला नाही. वैयक्तिक वा व्यावसायिक संबंधांमध्ये ते नेहमीच विनयशील, स्वाभिमानी, दुसऱ्याचा विचार करणारे, शालीन, उदार, निःस्वार्थी, सुसंस्कृत व मृदुभाषी होते.

शास्त्रींनी आपल्या राजकीय कारकिर्दित त्यांच्यावर जी जवाबदारी टाकण्यात आली त्या जवाबदारीचे इमानेइतबारे निर्वहन केले. त्यांच्या रेल्वे व परिवहन मत्रीत्वाच्या कारकिर्दीत त्यांनी रेल्वेत अनेक सुधारणा घडवून आणल्या. वाणिज्य व उद्योग मंत्री असतांना निर्यातीला प्रोत्साहन देणे, नवे औद्योगिक प्रकल्प उभारणे या गोष्टींकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. गृह मंत्री असतांना आसाम मधिल भाषीक वाद सोडवला त्याचप्रमाणे पंजाब मध्ये स्वतंत्र पंजाबी सुभ्यासाठी आंदोलनाची समस्या त्यांनी निपटून काढली. प्रशासनातील मूलभूत बाबींबद्दल शास्त्रींनी मंत्री व अधिकारी यांच्या संबंधांबाबत काही तत्त्वे ठरवून दिली. अधिकाऱ्यांना आपली मते स्पष्टपणे मांडता आली पाहिजेत. परंतु अखेर त्यांनी मंत्र्याचे आदेश पाळायला हवेत व मंत्र्यांनी आचारसंहिता स्वीकारावी. त्यांनी तोंडी आदेश वा सूचना देणे टाळावे. तसेच अधिकाऱ्यांनी गटबाजीच्या राजकारणातून दूर राहावे, असे शास्त्रींनी सुचविले होत. बिन खात्याचे मंत्री असतांना त्यांनी अत्यंत महत्वपूर्ण अशा प्रेषिताचा पवित्र अवशेष गायब झाल्यावर कश्मिरमध्ये उद्‌भवलेला पेचप्रसंग आपल्या बुद्धीचातूर्याने व न्यायबुद्धीने सोडवला. अशाप्रकारे शास्त्रीजींची राजकीय कारकिर्द ही विकासात्मक असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे आजच्या राजकीय परिस्थितीत त्यांचे कार्य प्रोत्साहक व अनुकरणीय असल्याचे देखील दिसून येते.

## संदर्भ


१) मनकेकर, डी. आर. (१९९६). लाल बहादुर शास्त्री, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, तृतीय संस्करण

२) श्रिवास्तव, सी. पी. (अनुवादक— अशोक जैन), लालबहादुर शास्त्री, राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम, आठवी आवृत्ती, २००७, रोहन प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे

३) मित्तल, हरिराम, (१९९६). लाल बहादुर शास्त्री, व्यक्ति और विचार, संपादक एस.सी. पाठक व जी.पी. श्रीवास्तव, एस.चन्द्र एण्ड कंपनी लि., नई दिल्ली.

४) Singh, Lallan Prasad, Portrait of Lal Bahadur Shastri: A Quintessential Gandhian, Ravidayal Publisher, New Delhi, 1996, pp- 96


9 Prasad, Rajeshwar, Days with Lal Bahadur Shastri: Glimpses from the Last Seven Years, Allied Publishers Limited, 15 J.N. Heredia Marg, Ballard Estate, Mumbai, 1991, pp- 45

१० श्रिवास्तव, सी. पी. (अनुवादक— अशोक जैन), लालबहादुर शास्त्री, राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम, आठवी आवृत्ती, २००७, रोहन प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, पृ. ६५—६६

११ श्रिवास्तव, सी. पी. (अनुवादक— अशोक जैन), लालबहादुर शास्त्री, राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम, आठवी आवृत्ती, २००७, रोहन प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, पृ. ६८

५) Prasad, Rajeshwar, Days with Lal Bahadur Shastri: Glimpses from the Last Seven Years, Allied Publishers Limited, 15 J.N. Heredia Marg, Ballard Estate, Mumbai, 1991, pp- 45